# जिल्हा परिषद (सा.बां.) दक्षिण विभाग, अहमदनगर

# बांधकाम विभागामध्ये विविध योजनांचे

# नियोजन व आराखडे तयार करण्याची कार्यपद्धती

जिल्हा परिषद (सा.बां.) **दक्षिण विभाग**, अहमदनगर

# बांधकाम विभागामध्ये विविध योजनांचे नियोजन व आराखडे तयार करण्याची कार्यपद्धती

---

(१) ***रस्ते दुरुस्ती कार्यक्रम*** :- जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत इतर जिल्हा मार्ग (O.D.R.) व ग्रामिण मार्ग (V.R.) हे दोन प्रकारचे रस्ते येतात. त्यांची देखभाल व दुरुस्ती जि.प. मार्फत करण्यात येते. रस्ते विकास योजनेतील (नकाशातील/ Plan Road) रस्त्यांचीच कामे याद्वारे घेतली जातात. शासनाने नुकताच २००१-२०२१ चा आराखडा मंजूर केलेला आहे. यात समाविष्ट असलेल्या रस्त्यांची देखभाल-दुरुस्ती यापूढे जि.प.ला करता येऊ शकेल.

रस्ते दुरुस्तीचे ढोबळ मानाने **दोन** प्रकार आहेत.

i) रस्ते सर्वसाधारण/किरकोळ/नियमित दुरुस्ती (Current Repairs /C.R.)

ii) रस्ते विशेष दुरुस्ती (Special Repairs /S.R.)

i) रस्ते सर्वसाधारण दुरुस्ती (गट अ) :- यामध्ये खालील प्रकारची कामे घेता येतात.

(अ) डांबरी रस्ता पृष्ठभागावरील खड्डे भरणे.

(ब) खडीचा रस्ता पृष्ठभागावरील खड्डे भरणे.

(क) उखडलेले कठडे व पॅरापेट इ.ची पुनर्बांधणी करणे.

(ड) किरकोळ स्वरुपात वाहून गेलेल्या भरावाची पूनर्स्थापना करणे.

ii) रस्ते विशेष दुरुस्ती (गट ब-क) :- रस्त्याचा दर्जा टिकविण्याची/सुधारण्याची कामे याद्वारे केली जातात.

उदा. रस्त्यांचे मजबूतीकरण करणे, डांबरी रस्त्याचे नूतनीकरण करणे, खडी पृष्ठभागाचे नूतनीकरण करणे ही कामे गट ब मध्ये येतात. गट क मध्ये विशेष प्रयोजनाची कामे उदा.कमकुवत पूलांची दुरुस्ती/मजबूतीकरण करणे, लहान मो-यांची बांधकामे व सुधारणा करणे इ. कामे घेतली जातात.

**योजना अंमलबजावणीची कार्यपद्धती**

रस्ते नियमित व विशेष दुरुस्ती :- सदर रस्ते दुरुस्तीचा कार्यक्रम यापूढे ग्रामविकास विभागामार्फत मंजूर होणार आहे. मा.उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन यांचे अ.शा.पत्र क्र.जिपर २०१२/प्रक्र८७/पंरा८ मुंबई ३२ दि.८/५/१२ अन्वये, रस्ते दुरुस्तीचा कार्यक्रम सन २०१२-१३करीता मुंबई येथे सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार सर्व तालुक्यातील लोकप्रतिनिधींच्या सूचनांनुसार कार्यक्रम तयार करण्यात आला असून, तो शासनाकडे सादर केला आहे. शासनाकडून मंजूरी व अनुदान उपलब्ध झाल्यानंतर, ग्रामिण रस्ते देखभाल-दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येतील.

## जिल्हा परिषद सेस निधी अनुदान

जिल्हा परिषद सेस हा जि.प.चा स्वनिधी असून, त्याचे उत्पन्न जिल्हा परिषदेला विविध मार्गांनी प्राप्त होते. या निधीची जि.प.वार्षिक अंदाजपत्रकात (Budget) दरवर्षी तरतूद/नियोजन केले जाते. त्यानुसार जि.प.च्या विविध विभागांना यातील तरतुदीनुसार कामे घेता येतात. बांधकाम विभागाकडील जि.प.च्या सेस निधीमधून खालील प्रकारची कामे घेता येतात.

सदर निधी त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. शासनाच्या दि. /४/२०११ च्या परीपत्रकानुसार, उपलब्ध निधीतून दायित्वाची कामे वजा जाता, शिल्लक रकमेच्या दीडपट रकमेची कामे हाती घेता येतात.

i) रस्ते व मो-या देखभाल-दुरुस्ती ii) तीर्थक्षेत्र व पर्यटन विकास कामे iii) दहन-दफनभूमी व्यवस्थापन iv) दळणवळणासाठी नविन होड्या, नावा खरेदी करणे. v) पं.स.कार्यालय, निवासस्थान, जि.प.विश्रामगृह देखभाल-दुरुस्ती vi) जि.प. जागेवरील अतिक्रमणे काढणे/कुंपण करणे इ.

## योजना अंमलबजावणीची कार्यपद्धती

जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, जि.प.सदस्य, सभापती पं.स. यांनी सुचविलेल्या वरील प्रकारच्या विविध कामांना उपलब्ध अनुदानानुसार मा. अध्यक्ष जि.प.अ‘नगर हे अंतिम मंजूरी देतात. त्यानुसार अंदाजपत्रके, निविदा इ.प्रक्रियाद्वारे ही कामे पूर्ण केली जातात.

सदर कामांबाबतचा पूर्ण अधिकार जिल्हा परिषदेला आहे. इतर कोणत्याही योजनेत घेता न येणारी, योजनाबाह्य रस्त्यांची (non plan) कामे जि.प.सेस निधीमधून घेतली जातात.

| अ. क्र. | उपलेखाशिर्षक | मंजूर वर्ष | प्राप्त निधी | खर्च निधी | मंजूर कामे | पुर्ण कामे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जि.प.सेस निधी | २०१२-१३ | २१०.९६ | १७७.५६ | ५१ | ५१ |
| | | २०१३-१४ | ४५९.९४ | ३८४.८९ | १४० | ९३ |
| २ | जिल्हा नियोजन समिती रस्ते | २०१२-१३ | १७११.१९ | १७०८.१८ | १६३ | १४७ |
| | | २०१३-१४ | १५२८.२१ | १०४३.०० | ६७ | ४२ |
| ३ | रस्ते सर्वसाधारण दुरूस्ती गट-अ | २०१२-१३ | २७८.११ | १५९.४२ | ४७ | ४६ |
| | | २०१३-१४ | ३१५.९१ | ४४.२० | ४३ | ३१ |
| ४ | रस्ते विशेष दुरूस्ती गट-ब | २०१२-१३ | ७६१.६४ | ४६७.९५ | १३० | १११ |
| | | २०१३-१४ | ९०२.४४ | १२८.९२ | ८८ | ० |
| ५ | रस्ते विशेष दुरूस्ती गट-क | २०१२-१३ | ७९.६० | १४.९७ | ४ | १ |
| | | २०१३-१४ | १०५.७५ | ० | १९ | ० |

जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणा-या राज्य, केंद्र शासनाच्या विविध योजनाची **प्रशासकीय मंजूरी** व अनुदान उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही संबंधित विभागामार्फत केली जाते व पुढील बांधकामाची अंमलबजावणी उदा. अंदाजपत्रके तयार करणे, तांत्रिक मंजूरी देणे, निविदा प्रक्रिया करणे, कामे सुरु करुन ती पूर्ण करणे व आर्थिक-भौतिक उद्दीष्ट साध्य करणे इ. कार्यवाही बांधकाम विभागामार्फत केली जाते.

| अ.क्र. | योजना / लेखाशिर्ष | प्रशासकीय मंजूरीची कार्यवाही कोणत्या विभागामार्फत केली जाते ? |
|---|---|---|
| १ | यशवंत ग्रामसमृद्धी योजना | ग्रामपंचायत विभाग |
| २ | ग्राम सचिवालय बांधणे. | ग्रामपंचायत विभाग |
| ३ | उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ निधी. | ग्रामपंचायत विभाग |
| ४ | तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम ( क वर्ग) | ग्रामपंचायत विभाग |
| ५ | दलित वस्ती सुधार योजना | समाजकल्याण विभाग |
| ६ | प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र बांधकामे व दुरुस्ती | आरोग्य विभाग |
| ७ | पशुवैद्यकीय दवाखाना बांधकामे व दुरुस्ती | पशुसंवर्धन विभाग |
| ८ | अंगणवाडी इमारती बांधणे. | महिला व बालकल्याण विभाग |
| ९ | सर्व शिक्षा अभियान,शाळा बांधकामे,दुरुस्ती व संरक्षक भिंत इ | प्राथमिक शिक्षण विभाग |
| १० | जिल्हा परिषद सेस निधी (रस्ते-मो-या/तीर्थक्षेत्र विकास/दहन | (सा.बां.) उत्तर / दक्षिण विभाग |
| ११ | मागासक्षेत्र अनुदान निधी (BRGF) | जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा (DRDA) |
| १२ | इंदीरा आवास योजना घरकुले | जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा (DRDA) |
| १३ | विक्री व सेवा केंद्र बांधणे. | जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा (DRDA) |
| १४ | १३ वा वित्त आयोग निधी (जि.प.स्तर) | बांधकाम/ल.पा./ग्रा.पा.पु. विभाग |
| १५ | जिल्हा नियोजन विकास समिती अंतर्गत कामे (DPDC) | मा.जिल्हाधिकारी (नियोजन विभाग) |
| १६ | स्थानिक विकास कार्यक्रम (आमदार, खासदार यांचा) | मा.जिल्हाधिकारी (नियोजन विभाग) |
| १७ | डोंगरी विकास कार्यक्रम | मा.जिल्हाधिकारी (नियोजन विभाग) |
| १८ | ठक्करबाप्पा आदिवासी विकास कार्यक्रम | प्रकल्प अधिकारी आदिवासी वि. राजूर |
| १९ | महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजना | गट विकास अधिकारी पंचायत समिती |
| २० | | |

## जिल्हा वार्षीक योजना (सर्वसाधारण) रस्ते –

जिल्हा वार्षीक योजना सन सर्वसाधारण अंतर्गत अर्थसंकल्पीत झालेल्या निधीच्या अनुषंगाने निधी मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात येतो. सदरच्या योजनेसाठी रस्त्यांच्या लांबी, मागणी व आवश्यकतेनुसार शासनाकडून निधी प्राप्त होतो. सदर योजनेमध्ये लोकप्रतिनिधी यांनी सुचविलेली रस्ते विकास योजना अंतर्गत मंजूर असलेल्या रस्त्यावर खडीकरण, डांबरीकरण, छोटेपूल व मो-या बांधने इ. कामे हाती घेता येतात. लोकप्रतिनिधींच्या मागणी नुसार सदर कामाचा संबंधीत उपविभागांकडून प्रस्ताव प्राप्त झाले नंतर शासन निर्णय क्रमांक जिवायो१००७/प्रक्र३९/का१४४४ दि.१६ फेब्रु.२००८ नुसार प्रशासकीय मान्यतेचे अधिकार जिल्हा परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडील (जिल्हा परिषद, नगर पालिका, महानगरपालिका, नगरपंचायत) योजनांसाठी त्यांना असलेले प्रशासकीय मान्यतेचे अधिकार प्रचलित पध्दतीप्रमाणे आहेत. त्यानुसार मंजूर नियतव्ययाचे दिड पट रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेनंतर सक्षम प्राधिकारा मार्फत (उपअभियंता - १ ते ५ लक्ष, कार्यकारी अभियंता – ५ ते २५ लक्ष, मा.अधिक्षक अभियंता – २५ लक्ष वरील) तांत्रीक मान्यता दिली जाते.

तांत्रिक मान्यता प्राप्त झाले नंतर निविदा प्रक्रिया करून कामे हाती घेतली जातात. सदरच्या योजनेचा प्राप्त होणारा निधी दोन वर्षाच्या मर्यादित कालावधीत खर्च करणे बंधनकारक आहे.

## १३ वा वित्त आयोग राज्यस्तर –

१३ वा केंद्रिय वित्त आयोगा रस्ते विकास योजने अंतर्गत रस्ते व पुल यांचे परिरक्षण या प्रयोजनार्थ शासनाकडून निधी प्राप्त होतो. सदर निधी अंतर्गत मा.उप सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई ३२ यांचे कडील पत्र क्रमांकःतेविआ२०११/प्र.क्र.३७४/रस्ते-१ दि.१२ ऑगस्ट २०११ अन्वये इतर जिल्हामार्ग व ग्रामीण मार्ग रस्त्यावर डांबरी नुतनीकरणाची कामे हाती घेताना इजिमा रस्त्याची किमान तिन कि.मी. सलग व ग्रामीण मार्गाची संपूर्ण लांबी अथवा किमान दोन कि.मी. सलग लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाची कामे हाती घेणेत येतात.

प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेनंतर सक्षम प्राधिकारा मार्फत (उपअभियंता - १ ते ५ लक्ष, कार्यकारी अभियंता – ५ ते २५ लक्ष, मा.अधिक्षक अभियंता – २५ लक्ष वरील) तांत्रीक मान्यता दिली जाते.

तांत्रिक मान्यता प्राप्त झाले नंतर निविदा प्रक्रिया करून कामे हाती घेतली जातात. सदरच्या योजनेचा प्राप्त होणारा निधी दोन वर्षाच्या मर्यादित कालावधीत खर्च करणे बंधनकारक आहे.

## आदिवासी उपयोजना रस्ते (TSP)–

आदिवासी उपयोजने अंतर्गत अहमदनगर जिल्हया मध्ये अकोले तालुक्यातील काही भाग आदिवासी असून सदर अकोले तालुक्यात १०६ गाव आदिवासी भागात आहेत (१३ जुलै १९७४) सदरच्या भागातील रस्त्यांच्या व मो-या बांधकामासाठी शासनाकडून निधी प्राप्त होतो.

सदरचे योजनेकरिता उपविभागाकडून शिफारस प्राप्त प्रस्ताव अधिक्षक अभियंता यांचे मार्फत शासनास सादर केले जातात. अर्थ संकल्पात समाविष्ट झालेल्या कामांना मुख्य अभियंता/ अधिक्षक अभियंता यांचे कडून प्रशासकीय मान्यता दिली जाते.

प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेनंतर सक्षम प्राधिकारा मार्फत (उपअभियंता - १ ते ५ लक्ष, कार्यकारी अभियंता – ५ ते २५ लक्ष, मा.अधिक्षक अभियंता – २५ लक्ष वरील) तांत्रीक मान्यता दिली जाते.

तांत्रिक मान्यता प्राप्त झाले नंतर निविदा प्रक्रिया करून कामे हाती घेतली जातात. सदरच्या योजनेचा प्राप्त होणारा निधी दोन वर्षाच्या मर्यादित कालावधीत खर्च करणे बंधनकारक आहे.